# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १३८२/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. भदन्त बुध्दरत्न संबोधि-महाथेरो, रा. कळमना रोड, जयभिम चौक, गौतम डेकोरेशनच्या मागे, कामठी, ता. कामठी जि. नागपूर-४४१००२ | सहाय्यक आयुक्त(अन्न), अन्न व औषध प्रशासन, भंडारा, ता.जि. भंडारा | सह आयुक्त(अन्न), अन्न व औषध प्रशासन, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १८.१२.२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : दि. २३.०५.२०२२

(२) द्वितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. २३.०५.२०२२

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : जन माहिती अधिकरी यांनी अपुरी व दिशाभुल करणारी माहिती दिल्यामुळे.

(४)व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : मा. राज्य माहिती आयुक्त साहेब यांनी अपीलार्थीला मानसिक आणि शारिरीक त्रास झाला आहे. त्याकरीता तसेच कायदा व सूव्यवस्थाचा मान राखण्यात यावे, याकरीता माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९(८)(इ) अंतर्गत आर्थिक नूकसान भरपाई अपिलार्थी यांना देण्याचे आदेश द्यावे तसेच मा. आयुक्त यांना योग्य वाटेल तो आदेश पारीत करण्याची कृपा करावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : दि. ०८.१२.२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. ०८.१२.२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : -- उपलब्ध नाही

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : १) मुंडीपार पिंपळगाव हाईवे रोडवर असलेल्या मौजा मूंडीपार गट क ३२१ व गट क २९७/१ येथे ताराचंद वालकर हा ढाबा/भोजनालय चालवित आहे

सदर ढाब्या मध्ये व्यंजन बनविण्याकरीता आपण परवानगी (लायसन्स) दिली काय याची माहिती दस्ताऐवजाच्या प्रत सोबत देण्याची कृपा करावी, २) ताराचंद वालकर हा जे ढाबा / भोजनालय चालवित आहे व सदर ढाब्याची परवानगी (लायसन्स) घेण्याकरीता संबंधीत विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेतले होते काय याची संपूर्ण माहिती दस्ताऐवजाच्या प्रत सोबत देण्याची कृपा करावी.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (अन्न) यांनी दिनांक १६.०२.२०२२ च्या पत्रान्वये अपिलार्थीस "अर्जात नमुद मुद्दा क्र. १ बाबत नोंदणी प्रमाणपत्राकरीता अर्ज करतेवेळी लागणारे दस्तावेजांबाबतची माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्याने सदरची माहिती ही उपलब्ध करुन देण्यास पेढी मालकाने आक्षेप घेतलेला आहे. त्यामुळे संदर्भिय अर्जाद्वारे मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्याने कायद्याचे कलम ८(१)(घ) अन्वये माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. उपरोक्त नमुद पेढीस नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले असून सदर प्रमाणपत्राची प्रत जोडण्यात येत आहे. तसेच मुद्दा क्र. २ बाबत अन्न सुरक्षा व मानदे कायद्यातंर्गत नोंदणी प्रमाणपत्र घेण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही" असे कळविले आहे.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : दि. २४.०२.२०२२
(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : दि. २४.०२.२०२२
(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती नाकारली आहे.
(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील
अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : दिनांक ११.०४.२०२२ रोजी सुनावणी दरम्यान "जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (अन्न) यांनी दिनांक १६.०२.२०२२ रोजी कळविलेला निर्णय कायम करण्यात येते सबब अपील अमान्य करण्यात येत आहे" असा आदेश पारीत करण्यात आला.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
राज्य माहिती आयोग खंडपीठ ★ नागपूर ★

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष उपस्थित राहून कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जानुसार पुरविलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे.

त्यावर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, श्री. अ. प्र. देशपांडे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह. आयुक्त (अन्न), श्री. कृष्णा रं जयपुरकर यांनी स्पष्ट केले की, अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची वैयक्तीक माहिती असल्याने, त्रयस्थ पक्ष, मे. ताराचंद वालकर यांना विचारणा करण्यात आली असता, त्यांनी कार्यालयातर्फे नोंदणी प्रमाणपत्र घेते वेळी सादर केलेले वैयक्तिक कागदपत्रे आधार कार्ड, फोटो (टॅक्सपावती) इत्यादी कागदपत्रे अर्जदारास दिल्याने त्याचा दुरुपयोग होऊ शकतो व सदर माहिती माझी वैयक्तिक माहिती असल्याने अर्जदारास पुरविण्यात येऊ नये, असे दिनांक ०४.०२.२०२२ च्या पत्रान्वये कार्यालयास कळविले होते. त्यामुळे

अपिलार्थीस अर्जात नमुद मुद्दा क्र. १ बाबत सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्याने कायद्याचे कलम ८(१)(घ) अन्वये माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. उपरोक्त नमुद पेढीस नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले असून सदर प्रमाणपत्राची प्रत अपिलार्थीस पुरविण्यात आली आहे. तसेच मुद्दा क्र. २ बाबत अन्न सुरक्षा व मानदे कायद्यातंर्गत नोंदणी प्रमाणपत्र घेण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही" असेही अपिलार्थीस कळविण्यात आले आहे.

६. **निष्कर्ष –**

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता असे निदर्शनास आले की, अपिलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने व त्रयस्थ पक्षाने स्वत:ची वैयक्तीक माहिती देण्यास आक्षेप घेतला असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वैयक्तीक माहिती वगळून उर्वरित देय असलेली माहिती पुरविलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढणे क्रमप्राप्त आहे.

**आदेश**

**वरील निष्कर्षावरुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★ सत्यमेव जयते

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १८.१२.२०२४**

जावक क्रमांक 990 दिनांक 5 MAR 2025

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर